Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 18/07/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या... आपलं महानगर My महानगर www.mymahanagar.com

## दिनविशेष



### समाजसुधारक साहित्यिक अण्णाभाऊ साठे

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नाव तुकाराम भाऊराव साठे. ते मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. ते मार्क्सवादी-आंबेडकरवादी विचारांचे होते. त्यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे झाला. जातीय भेदभावामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊ साठे यांच्यावर कार्ल मार्क्स आणि आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी अनेक कथा, कादंबऱ्या आणि कवितांचे लिखाण केले. इ.स. १९५८ मध्ये मुंबईत झालेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात आपल्या उद्घाटनपर भाषणात ते म्हणाले की, पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे, यातून त्यांनी जागतिक संरचनांमध्ये दलित आणि कामगार वर्गांचे महत्त्व स्पष्ट केले.

त्यांचे निखारा, नवती, फरारी, पिसाळलेला माणूस, जिवंत काडतूस, आबी, खुळंवाडा, गजाआड, बरबाद्या कंजारी, चिरानगरची भुतं, कृष्णाकाठच्या कथा इ. कथासंग्रह आहेत. चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ, वैजयंता, रत्ना, रूपा, गुलाम, चंदन, मथुरा, आवडी, वैर, पाझर या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. तर अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, शेटजींचे इलेक्शन, बेकायदेशीर, पुढारी मिळाला, लोकमंत्र्यांचा दौरा, माझी मुंबई, कापऱ्या चोर, मूक मिरवणूक इ. लोकनाट्ये आहेत. इनामदार, पेंग्याचं लगीन, सुलतान हे त्यांचे साहित्य संग्रह आहेत. त्यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यांनी पोवाडे, गीत आणि लावण्यांच्या माध्यमातून आपले विचार गरीब जनतेपर्यंत पोहोचवले. त्यामुळेच त्यांना लोकशाहीर पदवी देण्यात आली. इ.स. १९६१ मध्ये राज्य सरकारचा उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार त्यांना मिळाला. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे १८ जुलै १९६९ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jul 18, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401